श्री. विजय.म. गाडगीळ.
'अवधूत' प्लॉट नं.४३२,सेक्टर२५,
निगडी,प्राधीकरण,पुणे ४४
फोन नंबर : ०२० २७६५६६६६

सौ. यशस्विनी. मु. केंदूरकर
श्रीसमर्थ हौसिंग सोसायटी,
धन्वंतरी सभागृहामागे, पुणे ४११००४

( २०१४-जानेवारी महिन्यातील स्वाध्याय )

दा.प्रवेश : द.१-१ ' ग्रंथारंभ लक्षण '

**श्री.दा.अ अभ्यासक्रमात भाग घेतल्याबद्दल प्रथम सर्वांचे मन:पूर्वक अभिनंदन.**

या उपक्रमात भाग घेऊन तुम्ही एक महत्वपूर्ण निर्णय घेतला आहे.हा अभ्यास म्हणजे एक साधनाच आहे हे लक्षात ठेवा.या साधनेला सुरवात करीत असताना प्रथम दर्शनी कदाचित तुम्हाला असे वाटू शकेल की या अभ्यासात काय विशेष आहे ? नुसत्या गाळलेल्या जागा भरा, जोड्या जुळवा,एका वाक्यात उत्तर लिहा इत्यादीने काय साधणार आहे? हा तर लहान मुलांसाठीचा अभ्यास वाटेल पण या अभ्यासामागील शास्त्र नीट जाणून घेतल्यास तसे वाटणार नाही व दासबोधाची आवड निर्माण होईल यात शंका नाही.

" Simple to complex" या शिक्षण शास्त्रातील पायाभूत तत्वावर आधारलेला हा अभ्यासक्रम आहे. या वर्षी व पुढील दोन वर्षात दासबोध अभ्यासाची हळूहळू सवय होत जाऊन व अंतर्मुखता प्राप्त होऊन दासबोध खऱ्या अर्थाने समजण्याची कुवत आपल्याला प्राप्त होऊ शकते व आनंद वाटू लागतो. आपण स्वीकारलेला हा श्री.समर्थांचा वसा आहे. तो टाकून चालणार नाही. चिकाटीने व नेटाने अभ्यास करा व दासबोध अंतरी बिंबविण्याची पहिली पायरी चढा.या तुमच्या प्रयत्नात श्री.समर्थांचा आशीर्वाद तुमच्या पाठीशी नक्कीच राहणार आहे याची खात्री बाळगा.

प्रश्नांची उत्तरे लिहिताना पुढे दिलेल्या काही सूचना जरूर लक्षात ठेवा व त्याप्रमाणे स्वाध्याय पूर्ण करणायाचा प्रयत्न करा.

०१) **उगीच घाई गडबडीने स्वाध्याय लिहू नका. सावकाश पण समजून घेऊन उत्तरे लिहा. एक महिन्यात एक स्वाध्याय सोडवायचा आहे.त्यामुळे अभ्यासाला व चिंतनाला भरपूर वेळ आहे. स्वाध्याय पूर्ण करायचा म्हणून पूर्ण करायचा खटाटोप करू नका.**

०२) स्वाध्याय सोडविण्यापूर्वी समास सावकाशपणे व बारकाईने अर्थ समजून घेवून पुन्हा पुन्हा वाचा व मगच उत्तरे लिहा.

०३) गाळलेल्या जागी शब्द भरल्यावर तो शब्द अधोरेखित करा व ती ओवी पुन्हा एकदा वाचून तिचे मनन करा.

०४) ओव्यांचे स्पष्टीकरण करताना त्यांचा संदर्भ लक्षात येण्यासाठी प्रत्येक ओवीच्या आधीच्या ओवीचा अर्थ पहावा म्हणजे संदर्भ लक्षात येऊ शकतो.

०५) ओवी लिहिल्यावर तिच्यापुढे कंसात दशक क्रमांक, समास क्रमांक व ओवी क्रमांक लिहिण्यास विसरू नका.

हा समास प्रस्तावनारूप आहे. या ग्रंथाचे नांव काय, ग्रंथ लिहिणयाचा हेतू काय, या ग्रंथात कोणकोणत्या विषयांचा उहापोह केला आहे, या ग्रंथासाठी इतर कोणकोणत्या ग्रंथांचा आधार घेतला आहे,या ग्रंथाच्या अभ्यासाचे फल काय ? इत्यादी गोष्टींचे स्पष्टीकरण श्री.समर्थांनी या समासात केले आहे. ' आता श्रवण केलियाचें फळ । क्रिया पालटे तत्काळ । तुटे संशयाचें मूळ । येकसरां ।। हा संदेश व ओवी क्रमांक २८ ते ३७ या ओव्या नीट वचून लक्षात ठेवाव्यात. त्या योगे आपला दासबोध अभ्यासण्याचा उत्साह टिकण्यास मदत होईल.

प्रश्न ५ चे उत्तर लिहिताना आपणास या उपक्रमात भाग घेण्यास कोणी प्रवृत्त केले हे न चुकता लिहा.तसेच या आधी आपण दासबोध वाचन केले असल्यास आपल्याला काही आनंददायी, समाधान देणारे अनुभव आलेले असल्यास जरूर लिहून पाठवा.

दा.परिचय: द.१८-४ .'देहदुर्लभ निरूपण

दासबोध परिचयच्या अभ्यसार्थींचे दुसऱ्या वर्षात पदार्पण होत आहे.आपला ''धासबोध प्रवेश'' अभ्यास पूर्ण झाला त्याबद्दल आपणा सर्वांचे अभिनंदन.व आता आपण दुसऱ्या वर्षाचा अभ्यास सुरू करणार आहात त्यासाठी शुभेच्छा..हे वर्ष देखील आपल्याला समाधानी,सुखकारक,व आरोग्यदायी लाभो.

दशक १८, समास ४ मधे समर्थ देहाचे महत्व पुन्हा सांगत आहेत.या आधी समर्थानी पहिल्या दशकात नरदेहाचे स्तवन केले आहे तर दुसऱ्या दशकातील चौथ्या समासात मानवी शरीराचे महत्व वर्णिले आहे. या शिवाय दासबोधामधे अनेक ठिकाणी समर्थानी आपल्याला मिळालेल्या दुर्लभ आयुष्याचे सार्थक कसे करावे याचे विवरण केले आहे.हे सर्व संदर्भ वेळ काढून पहा.या भवसागरातून पार जायचे असेल तर देहरूपी नौकाच वाापरावी लागते व केवळ तीच आपल्याला पूर्णत्वाला नेण्यस उपयोगी पडू शकते असे स्पष्टपणे सांगितले आहे. देहाच्या सहायानेच आत्मारामाला जाणता येते व आत्मज्ञान प्राप्त करून घेता येते यावर श्री.समर्थांचा भर आहे.

नरदेहाला श्री.समर्थानी ' तारू ' असे म्हटले आहे.तारू म्हणजे नाव, तिचे शीड म्हणजे ' वैराग्य ', व तिचे सुकाणू म्हणजे ' विवेक ' या नावेचा उपयोग करून आपल्याला भवसागर तरून जायचे आहे.

देह अत्यंत दुर्लभ आहे व अनेक जन्मांनंतर प्राप्त झाला आहे म्हणून

**'' देह आहे तोपर्यंतच आपण परमात्म्याचे ज्ञान करून घेणे आवश्यक आहे.''** हा या समासाचा संदेश आहे.

या समासाचा सारांश लिहिताना तो आपल्या स्वत:च्या शब्दातच लिहा. पुस्तकातील सारांश लिहून काढू नका.

दा.प्रबोध : द.१-१ 'ग्रंथारंभ लक्षण' व द.२०-१० 'विमळब्रह्म निरूपण'

दासबोध प्रबोधच्या अभ्यसार्थींचे तिसऱ्या वर्षात पदार्पण होत आहे याबद्दल सर्वांचे अभिनंदन.

तिसऱ्या वर्षातील अभ्यासासाठी शुभेच्छा.आपण आता तिसऱ्या टप्प्याचा अभ्यस करणार आहात.यापुढील अभ्यास करताना चिंतनावर जास्त भर द्यावा व समर्थांचे मार्गदर्शन आपल्या जीवनात कसे आचरणात आणता येईल याचा विचार करावा.आपले वर्तन सुधारत आहे का ? याचे चिंतन करावे.

' ग्रंथारंभ लक्षण' समासात श्री.समर्थानी ग्रंथ लिहिण्याचे उद्दिष्ट स्पष्ट केले आहे - ' आता श्रवण केलियाचे फळ । क्रिया पालटे तात्काळ ' तसेच या ग्रंथाची फलश्रुती काय आहे हे देखील सांगितले आहे.

द.२० स.१० हा दासबोधाचा शेवटचा समास आहे. यातील १ ते २५ या ओव्या परब्रह्माच्या वर्णनाच्या आहेत. या जगात परब्रह्माव्यतिरिक्त दुसे काहीही नाही.जे काही आहे ते परब्रह्मच आहे.आपण सर्वजण(सवर सृष्टी)त्यामधेच आहोत व आपल्या आतही तेच कोंदाटले आहे.आपल्या जीवनाचे मुख्य उद्दिष्ट ते परब्रह्म जाणणे म्हणजेच त्याची अनुभूती प्राप्त करणे हेच आहे.दासबोधाचा अभ्यास केल्याने हे उद्दिष्ट साध्य होऊ शकते.दासबोध श्रवणाने हा बदल कसा घडतो व त्याचा परिणाम काय होतो याचे विवरण श्री.समर्थानी या समासात केले आहे.या दोन्ही समासांच्या अभ्यासाने आपल्याला काय साधायचे आहे हे स्पष्ट कळू शकते.

दासबोधाचा अभ्यास कसा करावा याचेही मार्गदर्शन या समासाच्या अखेरच्या ओव्यांमधे आले अहे. त्या सूचना नीट लक्षात घ्याव्यात. द.१ स. १ हा समास आपण या आधीच अभ्यासिलेला आहे.पण आता या समासाची व शेवटच्या समासाची सांगड घालता येणे आवश्यक आहे.

*********